**<u>प्रेसनोट</u>** दिनांक- ०७/०१/२०१९

## पालघर, जिल्हा परिषद, माध्यमीक शिक्षण विभागामधील शिक्षण अधिकारी यांना लाच स्विकारताना अटक

दिनांक ०७/०१/२०१९ रोजी, पालघर, जिल्हा परिषद, माध्यमीक शिक्षण विभाग येथील शिक्षण अधिकारी **मोहन शशीकांत देसले, ४९ वर्षे (वर्ग १)** यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १,००,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार हे खाजगी शिक्षण संस्थेत सहायक शिक्षक म्हणून २०१२ साली नोकरीस लागले होते. अद्यापपावेतो त्यांच्या पदास शिक्षण अधिकारी यांनी मंजुरी दिली नव्हती, म्हणून तक्रारदार यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्याबाबत उच्च न्यायालयाने तक्रारदार यांच्या बाजूने निकाल दिला होता. तरीदेखील तक्रारदार यांच्या पदास मंजुरी देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ३,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २,००,०००/- रुपये स्विकारण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, पालघर यांच्याकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८/१२/२०१८ व दिनांक ०५/०१/२०१९ रोजी पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, पालघर युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **मोहन शशीकांत देसले** यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून १,००,०००/-(एक लाख) रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले गुन्हयाचा पुढील तपास श्री. अजय आफळे, पोलीस उप अधीक्षक, ॲसीबी, पालघर हे करत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ९८७०१७४१९९ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- १०६४
२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

**निलिमा कुलकर्णी**
**पोलीस उपअधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे**

Scanned by CamScanner